मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याबाबत.

आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमामधून लोकवर्गणीची रक्कम भरण्यास परवानगी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१० /पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जानेवारी, २००५.**

**वाचा :-** (१) केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयातील पाणी पुरवठा विभागाचे इंग्रजी पत्र क्रमांक डब्ल्यू.११०११/४/२००२-टि.एम.-III दिनांक २२ जुलै २००३.
(२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि.क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१० /पापु-०७, दिनांक १४ ऑक्टोबर, २००३.
(३) शासन निर्णय,पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापापु/ १००३/प्र.क्र.२१० / पापु-०७, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४.
(४) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि.क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१० /पापु-०७, दिनांक १६ मार्च, २००४.

**शासन निर्णय :-**

मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्यासाठीच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भिय दिनांक १४ ऑक्टोबर, २००३ व दिनांक १६ मार्च, २००४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत.

२. सदर योजना लोकसहभागामधून राबवावयाच्या असल्याने, हातपंप उभारणी व स्त्रोत बळकटीकरण या दोन्ही **योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % भाग संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी उचलणे आवश्यक** करण्यात आले असून, योजनेत अनुसूचित जाती /अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची संख्या ५०% पेक्षा अधिक असेल तर, **त्या योजनेसाठी लोकसहभागाची रक्कम ५% करण्यात आली आहे.** या दोन्ही योजना टंचाई भागासाठी असल्याने विशेष बाब म्हणून संबंधित लाभार्थी जर ही लोकसहभागाची रक्कम पूर्णत: भरू शकत नसतील तर, लोकसहभागाची रक्कम संबंधित ग्राम पंचायतीने स्वत:च्या उत्पनातून भरण्यास मुभा देण्यात आली आहे. संबंधित ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास लोकसहभागाची ही रक्कम अथवा त्याचा काही भाग खासदारांच्या अथवा आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून भरण्यास या योजनेपुरती परवानगी देण्यात आली आहे.

३. तथापि, सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित केला नसल्याने आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून या कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबात अडचणी

निर्माण झाल्या होत्या. याचा विचार करून शासन असे आदेश देत आहे की, ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास, **हातपंप उभारणी** व **पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण** या योजनांसाठी लोकसहभागाच्या रक्कमेपैकी ८% रक्कम आमदारांच्या स्थनिक विकास निधीमधून व उर्वरित २% रक्कम संबंधित ग्राम पंचायतीने भरण्यास **या योजनेपुरती परवानगी देण्यात येत आहे.**

४. तसेच, आदिवासी क्षेत्रासाठी ५% लोकवर्गणी आवश्यक असल्याने, मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्य दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक कार्यक्रमांमधील **हातपंप उभारणी** व **पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण** हे कार्यक्रम राबविण्यात येत असलेल्या ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास या योजनांसाठी लोकसहभागाच्या रक्कमेपैकी ४% रक्कम आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून व उर्वरित १% रक्कम संबधित ग्राम पंचायतीने भरण्यास **या योजनेपुरती परवानगी देण्यात येत आहे.**

५. मा. पंतप्रधांनानी स्वातंत्र्यदिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांपैकी शालेय पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लोकवर्गणीची संपूर्ण रक्कम (१०% रक्कम) मा. आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून भरण्यास या पूर्वीच या विभागाच्या संदर्भिय क्र. ३ येथील दिनांक २७.२.२००४ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली असून ती या पुढेही चालू राहील.

६. या कार्यक्रमासाठीचा सर्वसाधारण क्षेत्रासाठीचा ९०% व आदिवासी क्षेत्रासाठीचा ९५% निधी थेट ग्रामपंचायतीला उपलब्ध करून दिला जाणार असून योजनेची अंमलबजावणी ग्रामस्तरावरच होणार असल्याने आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून उपलब्ध करून दयावयाच्या लोकसहभागाचा भाग मा. आमदार/ मा. खासदार यांच्या शिफारशीनुसार संबधीत ग्रामपंचायतीला, मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने दिलेल्या मंजूरीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधीत ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या बँक खात्यात जमा करावा.

७. या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या ग्रामपंचायतीने खर्चाचे विवरण संबंधित जिल्हा परिषदेला व जिल्हाधिकारी यांना सादर करावे.

८. हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव

D:\New Folder\GR PRIMEMINISTER PROGRAMME cr210 15.1.2005.doc

एच–856 –1अ

३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
७. मा. मुख्यसचिव
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७. तहसीलदार (सर्व)
१८. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१९. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२२. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
२७. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
२८. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३०. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

-------